# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ११.०८.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन दिनांक ११.०८.२०२६ रोजी, सकाळी ११.०० वा. नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण १८ अटक आरोपींचे आदान–प्रदान हे ट्रॉफीक इंजिनियरींग इन्स्टीट्युट, पोलीस नियंत्रण कक्षाजवळ येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. राजेंद्र दाभाडे, मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील २७ अधिकारी व अंमलदार हे आरोपींसह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.

**२) परिमंडळ क्र. ३ अंतर्गत पोलीस ठाणे पाचपावली येथील गैरकायद्याची मंडळी जमवुन खुनाचा प्रयत्न करणारे अट्टल गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

दिनांक १६.०७.२०२६ चे ०२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत शनिचरा मार्केट, कमाल चौक येथे फिर्यादी अजय खुमान चिचखेडे, वय २९ वर्षे हा त्याचे मित्रासह वाढदिवस साजरा करीत असतांना, आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी व त्यांचे मित्राला मारण्याचा प्रयत्न केला. तसेच जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने अग्नीशस्त्र फिर्यादीवर तानुन गोळी झाडली. ती जमीनीवर आदळली होती. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम १०९,२९६,३५१(३),१९०, १९१(२),१९१(३) भा.न्या.सं., सहकलम ३,४,२५ भा.ह.का. सहकलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्यातील आरोपी क्र. १) जगदिश विजय गोखले, वय २७ वर्षे, रा. तांडापेठ, चंद्रभागानगर, पाचपावली हा टोळीप्रमुख असुन, आरोपी क्र. २) अंकीत उर्फ बिट्टु सुर्यकांत चावरे, वय २७ वर्षे, रा. तांडापेठ, पाचपावली ३) नाचीकेत उर्फ छोटु भांजा केशव झाडे, वय १९ वर्षे, रा. नाईक तलाव, बांग्लादेश, पाचपावली ४) मयुर उर्फ दातऱ्या किशोर आदीत्य, वय २२ वर्षे, रा. लालघानी, बागेपुरा, बाहुली विहीरी जवळ, शांतीनगर ५) राकेश

नारायण भुरे, वय १९ वर्षे, रा. लालघानी, पहाडपुरा, शांतीनगर, ६) राहुल रामअवतार सिरसाठ, वय २३ वर्षे, रा. संभाजी कसार मंदीर जवळ, मस्कासाथ ७) चंद्रशेखर उर्फ चंदु सदाशिव पौनिकर, वय २० वर्षे, रा. चकनाचौक, लालगंज, शांतीनगर हे टोळीचे सदस्य आहेत. आरोपी हे कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी खुनाचा प्रयत्न, दरोडा, चोरी, घरफोडी, अश्लील शिवीगाळ करणे, मारहाण करणे, अवैद्य हत्यार बाळगणे असे मालमत्तेविरूध्द व शरीराविरूध्द वेगवेगळ्या पोलीस ठाणे मध्ये एकुण २३ गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरीकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ३, नागपुर शहर यांचे मार्फतीने सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा– १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३) यांनी केली आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती करणारे तसेच, संघटीत गुन्हेगारी करणारे गुन्हेगारांविरूध्द नागपुर शहर पोलीसांची शुन्य सहनशिलता (झिरो टॉलेरन्स) भुमिका कायम राहणार आहे.

**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगीरी :– समाजमाध्यमावर शस्त्र दाखवुन धमकाविणाऱ्या ईसमास शस्त्रासह अटक.</u>**

दिनांक १०.०८.२०२६ चे १५.१५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांचे पथक हे शरीराविरूध्द गुन्हे करणारे आरोपी, हद्दपार ईसम तथा सोशल मिडीया वरील शस्त्र दाखवुन पोस्ट करणारे ईसमाचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सोशल मिडीयावर चाकु दाखवुन धमकाविणारा ईसम बाबा बुध्दाजी नगर, पवन बुध्द विहाराचे बाजुला, वैशाली नगर येथे फिरत आहेत. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळण्याचे प्रयत्नात असतांना, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निकेश उर्फ निक्या रितेश लिंगायत, वय १९ वर्षे, रा. बुध्दाजी नगर, पवन बुध्द विहाराचे बाजुला, वैशाली नगर, पाचपावली, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एक स्टीलचा चाकु किंमती १,०००/– रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपीस सोशल मिडीयावरील व्हिडीओ बाबत विचारपुस केली असता, काही दिवसाअगोदर त्याने स्वतः तो व्हीडीओ अपलोड केल्याचे कबुल केले.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनात, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा. राजुसिंग राठोड व त्यांचे पथकाने केली.



**४) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ईसमाविरूध्द चालान कारवाई.**

दिनांक ११.०८.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग, अली ताज पान पॅलेस ही चालु दिसल्याने तेथे जात असतांना, पान टपरी मालक फारूक शेख मोईनुद्दीन व पान टपरी समोर जमलेले काही ईसम पळुन गेले. पान टपरीमध्ये कामाला असलेल्या ईसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मोहसिन शेख मेहमुद, वय २६ वर्षे, रा. तोहीद नगर, गॅस गोडावुन जवळ, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर असे सांगीतले. त्याचे टपरीची पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे ०२ हुक्का पॉट, हुक्का नळ्या, वेगवेगळ्या फ्लेवरचे सिगारेट तसेच खर्रा तयार करण्याची मशीन असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण ३८,६७५/—रू. चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपी हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता रात्री उशीरापर्यंत आस्थापना उघडी ठेवुन तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. पानटपरी चालकाविरूध्द कलम ३३ आरडब्ल्यु अन्वये चालान कारवाई करण्यात आली आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. सचिन फुंदे, पोहवा. अनुप लोलुसरे, पोअं. अर्शद शेख, योगेश सोनवणे, साहील भोयर, उमेश बावरे यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १०.०८.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, फिर्यादी प्रविण अशोक वैरागडे, वय ४४ वर्षे, रा. कन्नमवार वार्ड, जनता हायस्कुल जवळ, बल्लारपुर, जि. चंद्रपुर हे त्यांचे स्वीफ्ट कार क्र. एम.एच. ३४ ए.ए. १६४९ ने सोबत जावाई व आई श्रीमती ललीता अशोक वैरागडे, वय ६३ वर्षे व बहीण सौ. स्वाती राजेंद्र डांगे, वय ४३ वर्षे यांचेसह पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, खापरी येथील मनोहर लॉन ॲण्ड बॅन्क्वेट समोरील रोडवरून जात असतांना, महेंद्रा झायलो कार क्र. एम.एच. ०४ ई.एक्स. ९५७३ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे कारला मागुन जोरदार धडक दिल्याने

फिर्यादीची आई व बहीण गंभीर जखमी झाल्या. जखमींना उपचाराकरीता स्वामी विवेकानंद हॉस्पीटल, खापरी येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

यात्प्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. संतोष आंधळे ८३८०८३३४२४ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(२) भा.न्या.सं., सहकलम १९४ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे सदर</u> :—** दिनांक ११.०८.२०२६ चे ०९.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर हद्दीत, बॅक ऑफ बडोदा चे समोर, गड्डीगोदाम, कामठी रोड, सदर येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ७० ते ७५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सदर येथे संपर्क साधावा.

यात्प्रकरणी फिर्यादी शेख आसीफ शेख अन्सार, वय ३४ वर्षे, रा. टेका नविन वस्ती, मक्का मस्जीद जवळ, सदर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सदर येथे सफौ. नितीन विटोले यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** कु. मुस्कान जरीन शेख ईकबाल, वय २२ वर्षे, रा. शेष नगर, अनिस भाई यांचे घरी किरायाने, नंदनवन, नागपूर ही दिनांक ०८.०८.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, केस— काळे लांब. भाषा— हिंदी बोलते. ओळख— डाव्या हाताचे मनगटावर जुन्या जखमेचे निशान आहे.



कु. मुस्कान

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. १७ वे सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०३४५५/ २००९ | कलम ३२४, ३४ भा.दं.वि. | राजेश नाथ बकासरे, वय ३४ वर्षे, रा. तार ऑफीस समोर, मरीयम नगर, गायत्री गॅरेज चे बाजुला, सिताबर्डी, नागपुर. | १७.०८.२०२६ |
| २ | मा. १७ वे सह दिवाणी | ३०४३९२/ | कलम ३२४, | १) इमरान खान आभास खान, वय | १८.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | २००६ | ३४ भा.दं.वि. | २० वर्षे, रा. शाम टॉकीज चौक, भालदारपुरा, गणेशपेठ, नागपूर.<br>२) इकबाल अली शहादत अली, वय ३६ वर्षे,<br>३) हाशिब उर्फ मोनु हिजबुल रेहमान, वय २० वर्षे, दोन्हीही रा. अवस्थी नगर, प्लॉट नं. १६, पोलीस लाईन टाकळी मागे, गिट्टीखदान, नागपुर. | |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**